एक गोपी उखळ होऊन दुसरी कृष्ण झाली, तिसरी यशोदा होऊन दावें घेऊन कृष्णास बांधूं लागली. दोघी यमलार्जुन होऊन, एक उखळ होऊन, रांगत गेली, एक कृष्णासारख्या चोऱ्या करूं लागली, एक यशोदा होऊन बसली, तिच्याजवळ कित्येक जणीं गाऱ्हाणीं सांगूं लागल्या, एकीनें वस्त्राचा गुंडाळा करून, नखावर गोवर्धन धरला ! एक पूतना होऊन कृष्णास स्तनपान करविलें ! एक वेणु वाजवूं लागली. पेंद्या, सुदामा, वडज्या आदिकरून गोपाळांचीं कांहीं जणींनीं रूपें घेतलीं. अशा बाललीला गोपिका करून दाखवूं लागल्या. नंतर करुणावाणीनें प्रार्थना करून म्हणाल्या—हे भक्तपालका ! आमची उपेक्षा कां केलीस ? आतां जशी क्षीराब्धींत कमळा प्रगटली, तिचा हात तूं धरलास तसा आमुचा येऊन धर. पात्रांवर बसलेले भिकारी जर समर्थानें उठवून लाविले तर त्यांचें काय चालेल ? तुझ्या वियोगानें आमचे प्राण जाऊं पहात आहेत तरी एक वेळ दर्शन देऊन मनेच्छा पूर्ण कर.

मग गोपींचा अभिमान गळला असें श्रीकृष्णानें जाणून एकाएकीं प्रगट झाला. त्यास पाहतांच, गोपींस आमचा प्राण आला असें वाटून, धांवत जाऊन चरणास व गळ्यास मिठ्या मारूं लागल्या. नंतर रासमंडळ रचून सर्व जणींचा काम पूर्ण केला. तों सूर्योदय होतांच, सर्व नितंबिनी गोकुळांत गेल्या.

अशा प्रकारें सहा महिन्यांची रात्र करून गोकुळांतील स्त्रिया कृष्णानें भोगिल्या. परंतु राधा हरीवर रुसली होती; तिचें समाधान करण्याकरितां भक्तसखा कुंजवनांत आला. येथें बाळक्रीडाकथन समाप्त झालें.

अध्याय १८ वा.

अक्रूरागमन व कृष्णाचें मथुरेंत जाणें.

श्रीहरीचा प्रताप ऐकून कंस चिंताक्रांत होत्साता प्रधानांस ह्मणाला–आह्मांस नंदकिशोर आटोपेल असा कांहीं प्रकार योजावा. प्रधान ह्मणाले–धनुर्यागास आरंभ करून, नंदादि गौळ्यांसह बलराम श्रीकृष्णास मान देऊन आणवून, शेवटीं घात करावा, तरच आपलें कार्य साधेल. अशी प्रधानांची युक्ति ऐकून कंसास हर्ष मावेनासा होऊन, तुमच्या बुद्धीपुढें मला बृहस्पति उणा वाटतो असें बोलूं लागला. नंतर आणावयास पाठवावा कोण ? असा विचार चालला असतां अक्रूराची योजना केली, आणि त्यास बोलावून सर्व वृत्तांत कळवूव रथ घेऊन जाऊन रामकृष्णास आणण्याची आज्ञा दिली. ती वंदन करून अक्रूर रथ घेऊन निघाला; दुरून गोकुळ पाहतांच त्यानें साष्टांग दंडवत घातला. नंतर रथ नंदमंदिराजवळ येतांच, नंदानें

धांवत जाऊन क्षेमालिंगन दिलें. तोंच बलराम कृष्ण तेथें आले, ते अक्रूरास वंदन करण्यास धांवत जातांच, अक्रूरानें दंडवत घालून क्षेमालिंगन दिलें. मग मंदिरांत नेऊन आसनावर बसविल्यावर अक्रूरानें मथुरेचा समाचार कळविला आणि नंदास ह्मणाला—धनुर्याग पाहाण्याकरितां, बलराम कृष्णास घेऊन तुह्मां सर्वांस कंसानें बोलाविलें आहे.

असें ऐकतांच, नंद यशोदा ह्मणालीं—कंस कृष्णाचा घात करण्याकरितां रात्रंदिवस जपत आहे. अक्रूरा ! तूं आमचा आप्त याबद्दल विचार करून पाहा. असें ऐकून अक्रूर ह्मणाला—तुमच्या दृष्टीस हें बाळ दिसतें; परंतु कृतांतासही शिक्षा लावील. त्यावेळीं हरी ह्मणाला—तुह्मीं भिऊं नका, सर्व गौळी घेऊन मथुरेस चला. एका क्षणांत कंसास मारून टाकीन. असें ऐकतांच, त्याच्या पराक्रमावरून यास कळिकाळाचें भय नाहीं अशी सर्वांची खात्री झाली.

दुसरे दिवशीं सूर्योदय झाल्यावर स्नानसंध्यादि भोजन सारून, रामकृष्ण जाण्यास सिद्ध झाले. अक्रूरानें रथ तयार केला, गौळ्यांचा मेळा गोरसाच्या कावडी भरून निघाला. रामकृष्णानें यशोदारोहिणीस वंदन करून आज्ञा मागितली. त्यावेळीं यशोदेनें श्रीकृष्णाचे गुण आठवले. नंतर गोपिका हृदय पिटीत धांवत आल्या; त्यांनीं अपार शोक मांडून, अक्रूरापुढें पदर पसरून कृष्णदान मागूं लागल्या. सारांश,

गोकुळवासी जन माशासारखे तडफडूं लागले. तोंच राधा येऊन, चरणीं मस्तक ठेऊन हरिरूपीं लीन झाली. मग श्रीहरीनें अक्रूरास रथ चालविण्यास सांगतांच, रथ समीरगतीनें चालू झाला. त्यावेळचा शोक अवर्णनीय होय. नंतर गौळणी गोकुळांत यशोदेच्या मंदिरांत गेल्या. त्यावेळीं यशोदेनें अपार शोक मांडला.

इकडे रथ यमुनानदी उल्लंघून गेल्यावर, गौळी स्नानें करण्यास उतरले. बलराम कृष्ण रथांतच बसले होते. त्यावेळीं अक्रूराचे मनांत अनेक तर्क येऊं लागले. तो ह्मणाला—कंस यांचा घात करावयास जपत आहे, जर कांहीं विपरित प्रकार झाला तर मग काय करावें ? अशा चिंतेंत स्नान करण्यास जाऊन पाण्यांत बुडी मारिली; तोंच चतुर्भुज मूर्तीचें दर्शन होऊन मत्स्यकूर्मादिक अवतार चरित्रें दिसून, श्रीकृष्ण कंसास ओढून मारित आहे असेंही पाहिलें व सर्व सृष्टी कृष्णरूप दिसूं लागली. असा अद्भुत प्रकार पाहून, अक्रूरानें अनेक प्रकारें गुण वर्णन करून, साष्टांग नमस्कार घातला व तसाच बाहेर निघून, संध्यादिक कर्में सारून रथाजवळ आला; तों श्रीकृष्ण गदगदां हांसून अक्रूरास ह्मणतात—कांहो उशीर कां लाविला ? व जळांत अपूर्व काय पाहिलें ? असें ऐकतांच अक्रूर सद्गदित होऊन कृष्णचरणीं लीन झाला व आसवांनीं चरण धुतले

तोंच कृष्णानें आलिंगन देऊन, त्याचे नेत्र पुसिले. मग मथुरेजवळ येतांच नंद गौळ्यांसह गांवाबाहेर राहिला. नंतर अक्रूरानें कृष्णास माझ्या मंदिरास चला ह्मणून प्रार्थना करितांच, श्रीकृष्ण ह्मणाला–कंसास मारून, उग्रसेन राज्यावर स्थापून बंदिशाळा फोडीन, नंतर तुमच्या घरीं येईन. आजची रात्र आह्मीं येथें राहतों; तुह्मीं पुढें जाऊन कंसास बातमी द्यावी. ती आज्ञा वंदन करून अक्रूर मथुरेंत गेला, तेव्हां श्रीकृष्ण उपवनांत आल्याची बातमी मथुरेभर पसरली.

अध्याय १९ वा.

कंसवध.

श्रीकृष्ण नंद गौळ्यांसह मथुरेसमीप उपवनांत राहिल्यावर, अक्रूरानें कंससभेंत जाऊन, श्रीहरीस आणल्याचें वर्तमान कळविलें. तें ऐकतांच कंसाचें मन दचकून त्याची बुद्धि, चित्त, मन कृष्णरूप झालें, सर्व पदार्थ हरिरूप दिसूं लागले. स्नान करावयास बसला तों उदकांत, अन्नांत सर्व ठिकाणीं कृष्ण दिसूं लागला. हडप्यानें विडी करून दिली ती उघडून पाहतांच

आंत कृष्ण दिसला, नंतर अंतःपुरांत गेला तेथें स्त्रियांचाही मेळा हरिरूप दिसतांच, हांक फोडून बाहेर पळाला. सारांश— पृथ्वी, उदक, अग्नि, वायु, आकाश आदिकरून सर्वठायीं त्याला गोपाळस्वरूप दिसूं लागलें.

इकडे उपवनांत एक रात्र घालवून, दुसरे दिवशीं नित्यनेम सारून श्रीकृष्ण बलराम रथारूढ होऊन, मागें गौळ्यांचा भार व वाद्यगजरानें मथुरेंत प्रवेशला. धोबी वस्त्रें धुवून राजगृहांत चालले होते त्यांच्या जवळ वस्त्रें मागितलीं. तेव्हां धोबी म्हणाला— अरे गोरस चोरा ! तूं गौळ्यांबरोबर झोंबी घ्यावी, येथें मथुरेंत माझ्या हातानें शिक्षा पावशील. असें बोलतांच श्रीहरीनें मिठी घालून रजकाचें शीर छेदून टाकिलें. मग तीं वस्त्रें घेऊन गौळ्यांस वाटलीं. पुढें तंतुवाय नांवाचा शिंपी भेटला, त्यानें वस्त्रें आणून श्रीकृष्णाची मनोभावें पूजा केली.

नंतर कंसाची कुब्जा नांवाची दासी चंदनानें भरलेलें दिव्यपात्र घेऊन चालली होती, तिनें कृष्णास पाहिलें. ती कुरूप व विद्रूप अशी सर्वांगीं वांकडी होती. तिनें श्रीहरीवर आपला भाव ठेविला होता. हीच कैकईची मंथरादासी श्रीरामाचा द्वेष करणारी होय. तिला श्रीरामानें शाप दिला होता कीं, 'तूं सर्वांगीं वांकडी होशील.' मग उःशाप मागतांच सांगितलें होतें कीं, तूं कंसाच्या घरीं कुरूप दासी होशील व मी जेव्हां कंसवधार्थ मथु-

रेंत येईन तेव्हां वाटेंत तुझा उद्धार करीन. असो. कृष्णास पाहतांच तिनें स्वहस्तानें चंदन लाविला; असें पाहून तिला हातीं धरून आपल्या चरणाचा स्पर्श करून तिचें दिव्य शरीर केलें. नंतर माझ्या घरीं चला अशी प्रार्थना करतांच, कंसाचा वध करून तुझ्या घरीं येईन, असें श्रीहरीनें सांगितलें. असें ऐकतांच नमन करून घरीं गेली. इतक्यांत एक फुलारी येऊन, त्यानें फुलांच्या माळा श्रीकृष्णाच्या गळ्यांत घातल्या व साष्टांग नमन केलें.

श्रीकृष्ण गांवांत आला असें मथुरेंतील गोपींनीं ऐकून त्या सद्गदित होत्सात्या, यदुपतीला पाहाण्यास आल्या, कित्येक जेवीत होत्या, कोणी नग्न होत्या, कोणी कांडित होत्या; अशाप्रकारें कामधंदा करित असतां, तो तसाच टाकून देहभान विसरून धांवत आल्या. कित्येक जणींनीं रत्नदीप घेऊन श्रीहरीस ओंवाळले. असो. नंतर श्रीहरी धनुर्याग मंडपाजवळ येतांच, तेथें ठेवलेलें प्रचंड धनुष्य होतें, त्याचीं दोन खंडें करून हातांत घेतलीं, तोंच एक हजार रक्षक राजाज्ञेशिवाय धनुष्य मोडलें म्हणून रामकृष्णावर लोटले. त्याबरोबर धनुष्याचीं दोन खंडें दोघांनीं घेऊन, त्या एक हजार राक्षसांस झोडून गतप्राण करून कुंडमंडप विध्वंसून उपवनांत गेले.

ही बातमी कंसास कळतांच, त्यास कांहीं सुचेनासें झालें.



नंतर दुसरे दिवशीं नित्यनेम सारून बलराम कृष्ण रथांत बसून कंस वधावयास निघाले. तेव्हां सेवकांनीं कंसास जाऊन सांगितलें कीं, कृष्ण तुमच्या भेटीस येत आहे, असें ऐकतांच कंस सेवकांस ह्मणाला–आपला प्रचंड हत्ती कृष्णावर सोडून सांदींत रगडून टाकावा. त्याप्रमाणें कुवलय हत्ती सोडून देतांच त्यानें गौळीभारासह बलराम कृष्णास सांदींत कोंडून धरिलें. तेव्हां हत्ती हांकणारास कृष्ण ह्मणाला–मूर्खा, हत्ती दुसऱ्या मार्गानें ने. तो ह्मणाला–तुला याच्या पायांखालीं घालून रगडितों. असें ऐकतांच श्रीकृष्णास क्रोध येऊन, त्यानें हत्तीचें शेंपूट धरून गरगर फिरवून वरील दैत्यासह आपटून भिरकावून दिलें; तरी हत्ती पुनः धांवत अंगावर आला. त्याला दहा वेळ भिरकावून देऊन शेवटीं पाय धरून जमिनीवर आपटून प्राण घेतला आणि दोन्हीं दांत दोघांनीं हातांत घेऊन दैत्यांस झोडून, कंसाच्या महाद्वारांत आले व द्वारपाळांस हस्तीदंतांनीं झोडून गतप्राण करून रंगमंडपांत आले.

त्यावेळीं कंस सभेंत बसला होता, त्यानें या दोघांस पाहतांच, त्याला काळ न्यावयास आला असें वाटलें व मल्लांस प्रलयकाळ भासला ! द्वेषी गर्वहत होऊन त्यांची बोबडी वळली ! कंस, चाणूर, मुष्टिकांसह सभा भयाभीत होऊन, दाटून आपलें घर जाळण्यास अग्नि आणला असें बोलूं लागले. मुष्टिकचाणूरानें

धैर्य धरून श्रीरंगास मल्लयुद्ध करण्यास सांगतांच, कृष्ण चाणूरावरोबर व बलराम मुष्टिकावरोबर मल्लयुद्ध करूं लागले. त्यांचें तुंबळयुद्ध होऊन शेवटीं बलराम कृष्णानें दोघांचे प्राण घेतले. असें पाहतांच सर्व मल्ल नगरदुर्गावरून उड्या टाकून पळून गेले. नंतर शल तोशलांस आपटून मारिलें. मग आठजण श्रीकृष्णास धरण्यास उठले, त्यांसही बलरामानें आपटून मारिलें.

नंतर कंसानें भयाभीत होऊन, सेवकांस सांगितलें कीं, या दोघांस बाहेर नेऊन घालवा, वसुदेवदेवकीस जिवें मारा व गौळ्यांसह नंदाचा संहार करून, आधीं उग्रसेनास मारून यादवांचा निःपात करा. असें श्रीहरीनें ऐकतांच, सिंहासारखी उडी कंसावर घालून, झोंटी धरून धरणीवर पाडून मुष्टिघात दिला; त्यावरोबर कंसानें प्राण सोडला. अशा प्रकारें कंस मारतांच, देवांस आनंद होऊन, दुंदुभीचे घोष धडकून आकाश कोंदून गेलें. देवांनीं पुष्पवर्षाव केला, सर्व दुष्ट मथुरेंतून पळून गेले व सज्जन उरले ते प्रजाजनांसह हरीस शरण आले. उग्रसेनाच्या प्रधानानें कंसाचें कलेवर अग्नींत घालून त्याचें उत्तरकार्य केलें. बंदिशाळा फोडून उग्रसेनाची शृंखला तोडिली. मातृजनक उग्रसेन यास श्रीकृष्णानें नमन करून सुमुहूर्तावर सिंहासनावर बसविलें. त्यावेळीं जयजयकार होऊन यादवांचें तोंड उजळ झालें.

मग शेष नारायण उग्रसेनास व प्रजाजनांस बरोबर घेऊन

वसुदेव देवकीजवळ येऊन, त्यांस साष्टांग नमन केलें. तेव्हां वसुदेव देवकीस गहिंवर येऊन, श्रीकृष्णास हृदयीं धरून माया स्फुंदतस्फुंदत रडूं लागली आणि ह्मणाली–जगज्जीवना ! तुला मी स्तनपान करून न्हाणिलेंही नाहीं; अशी मी व्यर्थ जन्मास आलें. मग सर्वांच्या भेटी होऊन, मायबापास वस्त्रालंकार लेव-विलें. तेथें रोहिणीही आली. नंदादिक गौळी व वसुदेव देवकी भेटले व देवांनीं पुष्पवर्षाव केला.

तों तेथें अकस्मात ऋषिमंडळीसह गर्गमुनी येऊन, वसुदेव देवकीस, यांचा व्रतबंध करावा असें सांगतांच, रामकृष्णाचें मौंजीबंधन आरंभिलें. ब्राह्मणांस अपार दानें दिलीं. यथासांग चार दिवस सोहळा झाल्यावर नंद वसुदेवास विचारून गोकु-ळास निघाला. त्यावेळीं नंद सद्गदित झाला, त्याचें कृष्णानें समाधान केलें. मग नंद गोकुळांत जाऊन, मथुरेचा सर्व वृत्तांत गोपिका वैं गौळी यांस सांगितला. तो समाचार ऐकून स्त्रिया तटस्थ झाल्या. गोकुळांतील सर्व जन हरिचरणीं मन ठेऊन वर्तन करूं लागले. असो.

नंतर अक्रूरानें रामकृष्णांस मंदिरांत नेऊन पूजन केलें, व मथुरेंतील जन घरोघर हरीचें पूजन करूं लागले. कुब्जेनेंही घरीं नेऊन पूजन केलें. उद्धव व अक्रूर हे श्रीहरींचे आवडते, त्यांस श्रीकृष्ण घडीभरही विसंबत नसे. त्यांबरोबरच नेहमीं भोजन, शयन, गमन होत असे.

अध्याय २० वा.

श्रीकृष्णबलराम व सुदामा यांचा विद्याभ्यास.

त्यानंतर अवंती नगरांतील सांदीपन नांवाच्या महाऋषीजवळ सुदामा नांवाचा ब्राह्मण, बलराम व कृष्ण विद्याभ्यास शिकावयास चालले. जो सर्वज्ञ, ज्याला ज्ञानाभिमान नाहीं, वेदाज्ञा प्रमाण मानणारा, परदारा, परधन यांचेठायीं पराङ्मुख होणारा, परदोष न उच्चारणारा, आपण तरून दुसऱ्यास तारणारा, पुत्रापेक्षां शिष्यावर प्रेम ठेवणारा, पिंड ब्रह्मांड नाशिवंत व आत्मा शाश्वत, असें जाणून विरक्त असणारा, वैकुंठापासून पाताळापर्यंत ज्या भूताकृति त्यांस हरिरूप मानणारा, जो ब्रह्मानंद डोहांत पोंहणारा, अशा सद्गुरूस शरण जावें.

सांदीपन सर्वगुणसंपन्न होता, त्याच्या आश्रमापुढें शेष नारायणानें येतांच लोटांगण घातलें. रामकृष्ण आल्याचें कळतांच, सांदीपन धांवत येऊन त्रिवर्गास भेटून, बसावयास आसन देऊन क्षेमवार्ता पुसली. नंतर श्रीहरीनें तुह्मांस तनमनधनेंसीं अनन्य शरण आलों आहों असें ह्मटलें. तेव्हां गुरुजी ह्मणाले— तूं जगद्गुरू जगात्पिता आहेस, त्वां हंसरूपानें चतुरानन, सनकादिक यांस ज्ञानोपदेश देऊन उद्धरिलें ! तो तूं मला शरण आलास याचें आश्चर्य वाटत. ज्याचे श्वासीं वेद जन्मले त्याला

गुरूनें काय उपदेश करावा ! परंतु लोकसंग्रहार्थ गुरुची सेवा उघड करून दाखविली.

श्रीकृष्णानें चौसष्ट दिवस गुरुगृहीं राहून चौदा विद्या चौसष्ट कलांचा अभ्यास केला. गुरु शिष्यांचीं लक्षणें सांगितलीं. नंतर आत्मविद्येचें कथन केलें. असो. अशा प्रकारें संपूर्ण ब्रह्मविद्या सांदिपनानें जगद्गुरुस शिकविली. एकदां सांदीपनानें आपले स्त्रियेस एकांतीं सांगितलें कीं, आपले घरीं शेषनारायण आले आहेत यांस सेवा सांगूं नको. एके दिवशीं सांदीपन अनुष्ठानास गेला असतां, शेष नारायण व सुदामा घरीं बसले होते. तेव्हां गुरुपत्नी घरांत बोलूं लागली कीं, सात दिवस पाऊस पडत आहे, घरांत लांकडें नाहींत, आतां काय करावें ? असें वचन ऐकतांच तिघांनीं पुस्तकें बांधून ठेविलीं आणि अरण्यांत जाऊन सुकलेलीं लांकडें जमा करून तीन मोळ्या बांधून निघाले. तों असंभाव्य पाऊस पडून, चोहोंकडून गंगा भरल्या. त्यांतून तिघेही मोळ्या घेऊन येत होते.

इकडे गुरुजी घरीं येऊन पाहातात तों रामकृष्ण दिसले नाहींत. तेव्हां बायकोस विचारूं लागले. ती ह्मणाली—घरांत लांकडें नाहींत असें मी सहज बोललें होतें. ऋषि ह्मणाला—त्याच कार्याकरितां ते अरण्यांत गेले असावे. महामूर्खे ! तुमची स्त्रियांची जात निर्दय व कपटी असून कार्याकार्य ओळखित

नाहीं शेषनारायणास वनांत धाडलेंस, हें काय केलेंस ? असें बोलतांच कंठ सद्गदित होऊन, तो अरण्यांत शोधास निघाला व नांवें घेऊन करुणावाणीनें हांका मारीत चालला, तों तिघे मोळ्या घेऊन येतांना दृष्टीस पडले. त्याबरोबर सांदीपन धांवत जाऊन, कंठास मिठी मारून स्फुंदस्फुंदून रडूं लागला. मग घरीं येऊन मोळ्या उतरून ठेविल्या. तोंच ऋषिपत्नी धांवत येऊन, हरीच्या कंठीं मिठी घालून, माझ्याकडून थोर अन्याय झाला, असें बोलून रडूं लागली. तिला कृष्ण ह्मणाला—माते ! गुरुसेवेसारखें थोर दुसरें कांहीं नाहीं. गुरुसेवेवीण ज्या विद्या त्या अविद्या होतात. जो गुरुस्मरण करित नाहीं तो चंद्रार्कपर्यंत नरकांत बुडतो. असो. नंतर श्रीहरीनें गुरूचे घरीं अपार संपत्ति भरून, गुरुपत्नीस वस्त्रालंकार दिले. चौसष्ट दिवस लोटल्यावर श्रीकृष्ण गुरूस ह्मणाला—कांहीं गुरुदक्षिणा मागा. गुरु ह्मणाला—मला कांहीं वासना नाहीं. तुला टाकून दुसऱ्या वस्तूची जो इच्छा करील तो अभागी जाणावा. मग गुरुपत्नी ह्मणाली—कृष्णा ! तूं आमचा कैवारी आहेस, तरी माझा पुत्र समुद्रांत बुडाला तो दक्षिणेदाखल आणून दे. नंतर गुरुजीस हातीं धरून समुद्रतिरीं आला. तोंच सागर येऊन चरणीं लागून काय आज्ञा आहे ह्मणून विचारूं लागला. हरी ह्मणाला—गुरुपुत्र आणून दे. नंतर तिमिंगिल माशास बोलाविलें,

त्यानें पांचजन्य दैत्यानें भक्षण केला असें सांगितलें. मग श्रीहरीनें पांचजन्यास शोधून त्याचें पोट फाडलें परंतु त्यांत पुत्र मिळाला नाहीं. तेव्हां पांचजन्यानें वर मागितला कीं, माझें कलेवर हातांत धरावें. मग तो पांचजन्य हरीनें हातांत घेऊन, मृत्युपुरीस पुत्राकरितां गेला. तेथें यमाजवळ गुरुसुत मागतांच, यमानें त्याचा लिंगदेह आणून दिला. नंतर हरीनें देह निर्मून त्यांत लिंगदेह घालून पुत्र जिवंत करून गुरुपत्नीस आणून दिला. त्यावेळीं गुरुपत्नीनें श्रीहरीस आलिंगन देऊन लिंबलोण केलें. तेथून आज्ञा घेऊन श्रीकृष्ण मथुरेस आले. पुढें उद्धव गोपिकांस बोध करण्यास गोकुळास जाईल.

अध्याय २१ वा.

उद्धवाचें गोकुळीं आगमन व नंदादि गौळणींचें समाधान.

श्रीकृष्ण मथुरेंत असतां, गोकुळांतील नंदादिक प्रजाजन व गौळणी श्रीहरीच्या लीला, नामस्मरण आठवून, कृष्णभेटीकरितां झुरणीस लागल्या होत्या. यशोदा बाललीला आठवून, हे मधुसूदना ! आम्हांस टाकून गेलास. असे अनेक प्रकारें गुण वर्णन करीत होती. त्या गोकुळवासीजनांचा भाव श्रीहरीनें

जाणून, उद्धवास जवळ बोलावून ह्मणाला—माझ्या प्राणसख्या ! तूं गोकुळांत जाऊन, गोपिका माझ्या विरहानें दुःखित झाल्या आहेत त्यांस निर्वाण ज्ञान सांगून बोध करावा. माझा नंद पिता, यशोदा माता कंठीं प्राण ठेवून वाट पाहात आहेत, त्यांचें समाधान करावें. तसेच माझे प्रियकर गडी त्यांचीही समजूत घालावी. उद्धवा ! कामिनींची भक्ति सगुणीं जडली आहे, त्या वियोगामुळें प्राणत्याग करितील; यास्तव संपूर्ण ज्ञान व अध्यात्मविद्या उपदेशून ब्रह्मवादिनी कराव्या. असें सांगून उद्धवाच्या मस्तकावर हात ठेविला.

नंतर उद्धव दिव्यरथांत बसून, गोकुळाजवळ आला, तों गोपाळ गाई घेऊन मागें परतले, ते मुखानें श्रीकृष्णलीला गात चालले होते. उद्धव नंदद्वारीं येतांच, नंदानें धांवत जाऊन, क्षेमालिंगन दिलें व मंदिरांत नेऊन पूजन केल्यावर नंदानें गोकुळांतील हरीचे पराक्रम वर्णन केले. ते ऐकल्यावर श्रीकृष्ण गेल्या दिवसापासून त्यानें जे जे पुरुषार्थ केले ते सर्व वर्णन करतांच नंदयशोदा तटस्थ झालीं. नंतर यशोदेनें बाळक्रीडा सांगितली, तों रात्र सरून कामिनी घरोघर जाग्या झाल्या. उद्धव प्रातःस्नानाकरितां यमुनेवर गेला. सूर्योदय झाल्यावर गोपिकांनीं मंथनादिक आटोपून, पाणी आणावयास यमुनेवर नंदद्वारावरून चालल्या. तेथें दिव्यरथ पाहतांच गोपी ह्मणूं

लागल्या कीं, पूर्वी निर्दय अक्रूर येऊन श्रीकृष्णास घेऊन गेला; आतां कोण आला आहे तें कळत नाहीं, तों समोरून उद्धव येतांना दृष्टीस पडला, त्यास ओळखून चरण धरून ह्मणाल्या—आईबापाच्या समाचाराकरितां तुह्मांस श्रीहरीनें पाठविलें असेल ! आणखी त्याचे आप्त येथें कोण आहेत ?

असें बोलत आहेत तों एक काळा भ्रमर तेथें आला. त्यास गोपी ह्मणाल्या—तूं कृष्णवर्ण आमचें चित्त पाहण्याकरितां आला आहेस; तूं कृष्णाचा हेर ठकाचा महाठक येथें येऊन रुणझुण-तोस कां ? जसें तुझें चित्त एका कमळावर बसत नाहीं तसें तूं ज्याच्यापासून आलास त्याचेंही मन एकेठायीं बसत नाहीं. भ्रमरा ! मथुरेस जाऊन कृष्णास सांग कीं, तूं मथुरेच्या नारी सुखानें भोग, आमच्यापेक्षां कुब्जा सुंदर निवडिली आहेस, ती कुब्जा कोळशाहून गोरी, पिचक्या डोळ्यांची, मुड्या का-नाची, नाक बसलेलें, डोईंत उवा बुजबुज करित आहेत, गुडघे घांसित चालणारी, लांब स्तनाची, आंग वाळलेलें, वस्त्र फाट-लेलें, माकडासारखें तोंड, अशा त्या कुब्जेस तूं भाळलास ? तरी गोकुळांतील गोपिका सर्व जळल्या, त्यांच्या राखेवर एकदां येऊन मुरली तरी वाजीव व आपल्या पदीं पावन कर.

अशी गोपिकांची भक्ती पाहून उद्धवाच्या नेत्रांतून अश्रु वाहूं लागले आणि तो ह्मणाला—यांनीं सगुणमूर्ती हृदयीं दृढ

धरिली आहे ती उडवून टाकून यांस ब्रह्मज्ञान कसें सांगूं ? नंतर त्यानें गोपिकांस निर्वाण ज्ञानाचा अनेक प्रकारें बोध केला, तो ऐकतांच, उद्धवाचे चरण धरले व त्याला चार महिने राहविला; त्याच्या मुखानें नित्य ब्रह्मज्ञान श्रवण करतांच गोपींच्या चित्ताचा मळ तुटून, दिव्यज्ञान ठसून राहिलें. नंतर गोपिकांनीं उद्धवास घरोघर नेऊन पूजा केली. ज्या ज्या ठिकाणीं श्रीकृष्णानें क्रीडा केली त्या त्या ठिकाणीं उद्धव गाई गोपाळांसह वनांत जाऊन नमस्कार करी. मग उद्धव सर्वांचें समाधान करून, नंद यशोदेचा निरोप घेऊन, रथांत बसून मथुरेंत आला व कृष्णास साष्टांग नमस्कार घालून, सर्वांचे अहेर अर्पण करून सर्व वर्तमान सांगितलें, नंतर आपल्या घरीं गेला.

अध्याय २२ वा.

जरासंधाचा पराजय, कालयवनाचें भस्म, मुचकुंदोद्धार व बलरामाचें लग्न.

उग्रसेन श्रीहरीकृपेनें मथुरेचें राज्य करित असतां, मथुरावासीजन आनंदानें नांदत होते. तों कंसाच्या अस्ती व प्राप्ती नांवाच्या स्त्रिया आपल्या जरासंध बापास सांगावयास गेल्या कीं, कृष्णानें तुझ्या जांवयास व मुष्टिक चाणूरादिकांस मृत्युपं-

थास पाठवून, मथुरेचें राज्य उग्रसेनास दिलें. त्यामुळें सर्वजन सुखानें नांदत आहेत. असें वचन ऐकतांच मागधास अनिवार क्रोध चढून, कन्यांचें समाधान करून ह्मटलें–मथुरानगर क्षणांत जाळून, यादवांस मारून रामकृष्णास धरून आणितों. अशी होड मारून तेविस अक्षौहिणी सैन्य सिद्ध करून, चतुरंग दळासह रातोरात मथुरेस येऊन वेढा दिला. असें पाहतांच, सर्व लोक घाबरून गेले.

त्यावेळीं उग्रसेन बलराम कृष्णाजवळ येऊन आतां काय करावें ह्मणून विचारूं लागला. इतक्यांत श्रीहरीनें आकाशाकडे पाहिलें, तों दोन रथ आयुधांसह खालीं उतरतांच दारूक सारथ्यानें कृष्णास साष्टांग दंडवत घातला. मग श्रीकृष्ण चतुर्भुज होऊन चार आयुधें हातांत घेऊन रथावर चढला व बलराम नांगर मुसळ घेऊन सिद्ध झाला. असें पाहतांच, उग्रसेनास स्फुरण येऊन चतुरंग दळ सिद्ध करून, निशाणीं घाव घातले. दोन्ही सैन्यें एकत्र मिळून तुंबळ युद्ध होऊन, यादव सैन्य मागें फिरलें. असें रामकृष्णांनीं पाहून रथ पुढें लोटले आणि असंख्य सैन्याचा संहार केला. बलरामानें नांगर घालून जरासंधास खालीं ओढून, चूर्ण करणार, तोंच श्रीहरीनें सांगितलें–यास मारूं नको, रथास बांधून नेऊं. इतक्यांत देववाणी झाली कीं, " याचें मरण भीमाचे हातून होईल. " मग वरुणपाशानें रथास बांधिला. त्यावेळीं जरासंधाचे वीर पळून गेले.

नंतर श्रीरंग बलरामास ह्मणाला—आतां यास सोडून दे ह्मणजे आणखी दैत्य मिळवून आणील. मग जरासंध स्वस्थ-ळास येऊन ह्मणाला—मी बावीस हजार राजांस बंदींत टाकिलें तो माझा पराक्रम आज व्यर्थ गेला. तरी तपास जा-ऊन बसावें. अशा विचारांत आहे तों रुक्मया, शिशुपाळ, वक्रदंत मार्गांत भेटून ह्मणाले—प्रसंगीं वीरास जय अथवा अ-पजय मिळाला तरी पुरुषार्थ सोडूं नये. पुनः दळभार घेऊन रामकृष्णास धरून आणूं. मग तितकेंच सैन्य मिळवून पुनः जरासंधानें मथुरेवर धांवणें केलें. तों बलरामानें पुनः वरुणपा-शांत बांधला; त्याला श्रीहरीनें सोडून लाविला.

असा तुंबळ संग्राम होऊन सत्रा वेळ बलरामानें धरला व श्रीरंगानें सोडून दिला. इतक्यांत नारद मुनी जरासंधाचे भेटीस येऊन ह्मणाला—तूं काळयवनास साह्य घे, त्याला शि-वाचा वर आहे. त्याचें वर्तमान सांगतों ऐक. यादवांचा कुळगुरु गर्गाचार्य, त्याला एका यादवानें आपली कन्या दिली, तिला संतान कांहीं झालें नाहीं. तेव्हां यादव गर्गऋषीस षंढ ह्मणाले. तें ऐकून मुनीस क्रोध येऊन बोलला—मी असा पुत्र निर्माण करितों कीं, तो तुमचा पराभव करील ! मग त्यानें हिमालयावर जाऊन, तप करून, शंकराजवळ वर मागितला कीं, जो यादवांचा पराभव करून राज्य हिरून घेईल; असा

मला पुत्र द्यावा. शिव ह्मणाला—तूं अनुष्ठान करित असतां एक म्लेंच्छ स्त्री भोग मागेल, तिच्या पोटीं महा दुष्ट पुत्र होईल. मग अनुष्ठान करित असतां, एका म्लेंच्छ राजाला पुत्र संतति होईना ह्मणून आपली स्त्री शृंगारून गर्गाकडे पाठविली, तिला भोग दिला तोच हा कालयवन जन्मला. त्याला घेऊन मथुरेवर जा.

असें ऐकून जरासंध कालयवनाजवळ जाऊन सर्व वृत्तांत सांगतांच त्याला कोप चढून तीन कोटी म्लेंच्छ सैन्य व मागधाचें तेविस अक्षौहिणी, शिवाय रुक्मया शिशुपाळ साह्य होऊन रातोरात आले. तें श्रीकृष्णानें जाणून समुद्राजवळ ठाव मागून ब्रह्मदेवाकडून द्वारकानगर रचविलें, आणि सर्व मथुरेंतील लोकांवर योगमाया घालून रातोरात द्वारकेंत नेलें. दारुक सारथी, रथ, आयुधें व बळिभद्र यांसही पाठविलें. द्वारकेंत लोक जागे होतांच, त्यांस आश्चर्य वाटलें व नगर आपलें नव्हे असें ओळखलें. नंतर हरीची करणी कोणासही कळणार नाहीं असें ह्मटलें.

इकडे कालयवन व जरासंध सूर्योदयापूर्वी, कृष्ण पळेल ह्मणून मथुरेंत आले. सूर्योदय होतांच पाहूं लागले तों नगर ओस असून, एकटाच कृष्ण दारांत उभा होता. तेव्हां त्यांस आश्चर्य वाटून गोवळा कपटी समजून त्यालाच धर-

ण्याचा निश्चय करून, कालयवन रथाखालीं उतरून, श्रीहरीच्या पाठीस लागला. श्रीकृष्ण नर्मदा, तापी, गोदावरी, भीमा इत्यादि नद्या उल्लंघून, दक्षिण प्रयागीं येऊन उभा राहिला. तेथें भार्गवरामाचें व त्याचें क्षेमालिंगन होतांच, कृष्णानें सर्व वर्तमान सांगितलें. कालयवन मागें लागलेलाच होता, तो त्यास उणें वांकडें बोलत धांवत येत होता.

पुढें श्रीकृष्णानें पराशर पर्वतावर जाऊन, पराशर ऋषीस वंदन केलें. तेथें कृष्ण दिसेनासा होतांच, कालयवनानें भोंवतालीं अग्नि लाविला. असें पाहून ऋषि जळून मरतील यास्तव श्रीहरीनें पर्वत खालीं दडपून पाणी वर आणून अग्नि विझविला. तेथून पश्चिमेकडे पर्वताचे दरींत मुचकुंदानें श्रमून निद्रा केली होती तिकडे धांव घेतली.

मुचकुंद हा सूर्यवंशी मांधाता राजाचा पुत्र, त्यानें दैत्याशीं युद्ध करून देव सुखी केले होते. पुढें कार्तिकस्वामीनें स्वर्गाचें रक्षण केलें, मुचकुंदास इंद्र प्रसन्न होऊन, वर माग बोलतांच तो ह्मणाला—मी बहुकाळ निद्रा करीन, जो माझी निद्रासमाधि मोडील तो तेथेंच भस्म होईल. माझ्या निद्रेअंतीं मला जगज्जीवन भेटावा. मग इंद्रानें तथास्तु ह्मणतांच, तो विवरांत जाऊन निजला होता. त्याच विवरांत श्रीहरी शिरतांना कालयवनानें पाहिलें. श्रीहरीनें पुढें जाऊन आपला पितांबर मुचकुंदाचे अंगा-

वर टाकून, गुप्त होऊन राहिला. कालयवन आंत शिरतांच पितांबर पाहून कृष्णच निजला आहे असें समजून, लत्ताप्रहार केला. तोंच कालयवन मुचकुंदाचे दृष्टीनें भस्म झाला.

मुचकुंद सावध होऊन पाहूं लागला, तों चतुर्भुज मूर्ती दृष्टिस पडतांच, साष्टांग दंडवत घातला व आपण कोण म्हणून विचारलें. श्रीकृष्ण होय ? त्यावेळीं इंद्रानें दिलेल्या वराची त्याला आठवण झाली. मग मुचकुंद स्तवन करतांच कृष्ण म्हणाला—तूं आतां बदरिकाश्रमीं जाऊन राहा, तूं निर्वाणज्ञानी होशील, माझी भक्ति मात्र विसंबूं नको. असा अनेक प्रकारें उपदेश केल्यावर विवराबाहेर निघाला. तेव्हां द्वापाराचा अंत होऊन, पुढें कली दिसूं लागला, मग तसाच निघून बद्रिकाश्रमीं जाऊन संतसमागमांत राहिला.

इकडे विवराबाहेर यादवेंद्र निघतांच, द्वारकेहून बळिभद्र समाचाराकरितां आला. तोंच जरासंध व कालयवनाचें सैन्य मागोमाग आलें. तें रामकृष्णांनीं पाहतांच, चव्वेचाळीस कोश उंचीचा जो गोमंताचळ त्यावर चढून गुप्त झाले. असें पाहतांच जरासंधादिकांनीं चोहोंकडून अग्नि लाविला. इतक्यांत वैकुंठाहून हरिइच्छेनें गरूड आला, त्यावर दोघे बसून चालते झाले. हरिवंशांत भीमक रथ घेऊन आला. त्यावर रामकृष्ण करवीरापासून बसले अशी कथा आहे. असो.

रामकृष्ण मथुरेकडे चालले असतां, द्वारकेहून दारुक रथ घेऊन आला. त्यावर दोघे बसून मथुरेस जात होते; तों जरासंध सैन्यासह आला. असें पाहतांच श्रीहरीनें सुदर्शन हातीं घेऊन, त्यानें मुख्यांशिवाय बाकीच्यांचा संहार केला आणि मथुरेंत शिरून उग्रसेनाचें द्रव्य काढलें; भूमींतील द्रव्याच्याही गाड्या भरून द्वारकेस चालविलें असतां जरासंध धांवत आला. त्याचा श्रीहरीनें अठरावेळ पराभव करून द्वारकेस गमन केलें.

इकडे आनर्त्त देशाच्या रेवत राजानें ब्रह्मदेवास विचारलें कीं, माझ्या रेवतीकन्येयोग्य वर सांगावा ! मग तुझ्या कन्येस बलराम योग्य वर आहे असें सांगून, ब्रह्मदेव, राम, कृष्ण उग्रसेन दळभारासह आनर्त देशांत जाऊन बळरामाचें रेवतीबरोबर लग्न लाविलें आणि द्वारकेंत आले. पुढें रुक्मिणी स्वयंवर वर्णन केलें आहे.

अध्याय २३ वा.

रुक्मिणीहरण.

विदर्भ देशांत भीमक नांवाचा सर्वगुणसंपन्न राजा जगप्रसिद्ध होता. त्याला रुक्मी, रुक्मरथ, रुक्मबाहू, रुक्मकेशी, रुक्ममाळी असे पांच पुत्र असून सहावी रुक्मिणी नांवाची

सुंदर कन्या होती. तीच हरीची ज्ञानकळा होय. तिला मांडीवर घेऊन भीमकराजा सभास्थानीं बसला असतां, चौसष्ट कलेंत प्रवीण असा कीर्तिमुख नांवाचा ब्राह्मण पृथ्वीपर्यटण करीत राजाचे सभेंत आला. राजानें त्याचें आदरातिथ्य केल्यावर, ब्राह्मण ह्मणाला—राजा ! मी पृथ्वीचे पुष्कळ नृपती पाहिले व सहज द्वारकेस आलों. तेथें श्रीकृष्ण पाहिला. असें सांगून त्याच्या स्वरूपाचें वर्णन केलें; तें ऐकतांच, रुक्मिणी मूर्च्छित होऊन पडली. तिला दासीनीं सावध केली. त्याचवेळीं राजानें रुक्मिणी श्रीकृष्णास अर्पण करण्याचा निश्चय करून शुद्धमतीस सांगितलें, तेव्हां तिलाही तें मान्य झालें. परंतु कृष्णाचा द्वेष करणाऱ्या रुक्मयानें शिशुपाळास देण्याचा दृढ निश्चय करून, श्रीहरीची निंदा करूं लागला व ह्मणाला-तो महाकपटी गोरस चोर, स्त्री हत्या करणारा, मामाचें अन्न भक्षण करून त्यालाच मारणारा, त्यासीं व रुक्मिणीसीं लग्न घडलें तर आह्मीं जिवंत असून मेल्याप्रमाणें होय. जर त्या उभयतांचें लग्न लागेल तर माझी दाढी मिशी काढून टाकावी. असें बोलून नगर शृंगारून लग्नाची तयारी केली व शिशुपाळास बोलावणें पाठविलें.

ती वार्ता रुक्मिणीनें ऐकतांच, तिचें मुख उतरून जाऊन चिंतेंत पडली व आतां वैकुंठनाथास जाऊन कोण आणील ? अशा विचारांत पडली. तोंच सुदेव नांवाचा ब्राह्मण मंदिरांत

आला. त्यास सर्व वृत्त सांगून सप्त श्लोकांचें लिखित पत्र देऊन कृष्णास आणावयास पाठविलें. सुदेव द्वारकेंत येऊन कृष्णास भेटला. कृष्णानें त्याची षोडशोपचारें पूजा केल्यावर, ब्राह्मणानें भीमकीचें पत्र हातीं दिलें. तें वाचतांच, दारुक सारथ्यास रथ तयार करण्यास सांगितला आणि फक्त तिघेजण रातोरात कौंडणपुराजवळ आले.

इकडे रुक्मिणीस हळदी लावल्यावर, भीमक विचार करूं लागला कीं, जर यावेळीं द्वारकानाथ येईल तर माझ्या एवढा पुण्यवान् कोणी नाहीं. पण तो येणार कसा? मी त्यास पत्रही पाठविलें नाहीं! अशा चिंतेंत असतां, दूतांनीं शिशुपाळ नवरा लग्नास आल्याचें राजास कळवितांच, तो दुःखी झाला. रुक्मयास आनंद होऊन सामोरा जाऊन जानवशास स्थळ दिलें. इकडे बलराम, उद्धव, अक्रूर यांस श्रीकृष्ण रुक्मिणी हरणास गेला असें कळतांच ते सैन्यासह पाठोपाठ कौंडणपुरास आले. रुक्मिणी पाठविलेला ब्राह्मण अजून कां येत नाहीं म्हणून चिंतेंत असतां, श्रीहरीनें सुदेवास पुढें पाठविलें. तो भीमकीजवळ येतांच, तिनें चरणास मिठी घातली. नंतर सुदेवानें श्रीकृष्णास आणल्याचें कळवितांच, भीमकी गच्चीवर चढून पाहूं लागली, तों यादव सैन्यांत शेषशाई रथावर दृष्टीस पडला. भीमकाला व राणीला समाचार कळतांच ब्रह्मानंद झाला. जरासंधादिक व रुक्मयास संताप वाटला.

नंतर भीमकराजा नगराबाहेर जाऊन रामकृष्णास भेटला. त्यांस नगरांत राहण्यास स्थळ देतांच, कृष्ण ह्मणाला—मागध, चैद्य आमचे वैरी त्यांपासून दूर असावें. यास्तव अंबिकापुरीं आह्मांस स्थळ द्यावें. त्याप्रमाणें राजानें नगरांतून अंबिकापुरीं नेऊन ठेविला व सर्व सामग्री पुरविली. त्यावेळीं चैद्य मागधांस रुक्मया ह्मणाला—आमचा बाप व आई कृष्णाकडचीं झालीं आहेत. त्या घातकी कपट्याचा विश्वास नाहीं, यास्तव सैन्यानिशीं सावध राहा. लग्न लागल्यावर यादवांस क्षणांत निवटून काढूं. मग सर्वांस ह्मणाला—आतां शिशुपाळ नवरा आणूं चला. इतक्यांत शुद्धमती राणी ह्मणाली—आधीं अंबिकेचें पूजन करून मग लग्न लावावें असा कुळाचार आहे. रुक्मया ह्मणाला—आधीं लग्न लावून मग नवरी अंबिकेच्या पूजनास नेऊं. राजानें ह्मटलें—कुळधर्म टाकून अविधी कसा करावा ?

मग लक्षानुलक्ष वीरांसह रुक्मया रुक्मिणीस घेऊन अंबिकेच्या पूजनास येतांच, भीमकी सख्यांसह देवळांत शिरली, आणि षोडशोपचारें पूजा करून, देवीचें स्तवन मांडून ' श्रीपती मला वरो ' असें बोलतांच अंबेनें निळ्या कमळाची माळा हातांत देऊन हिनें श्रीकृष्णास वर असें सांगितलें. नंतर प्रदक्षिणा करित असतां, तिचें स्वरूप चैद्य मागधांच्या दृष्टीस पडतांच, सर्वांवर कामास्त्र पडून ते मूर्च्छित पडले. रुक्मिणी

दारुकाच्या दृष्टीस पडतांच, त्यानें रथ लोटितांच, श्रीकृष्ण भीमकीजवळ आला आणि रथावर घेतली. भीमकीनें श्रीकृष्ण पाहतांच, हातांतील माळ गळ्यांत घातली आणि चरणावर मस्तक ठेविलें. तोंच बृहस्पतीनें मंगळाष्टकें व ब्रह्मदेवानें ॐपुण्याह ह्मणून पुष्पवर्षाव केला. नंतर रुक्मिणीस घेऊन श्रीकृष्ण द्वारकेकडे वळला, व नारद मोठ्या हर्षानें आतां युद्ध होईल ह्मणून नाचूं लागला.

अध्याय २४ वा.

रुक्मिणीस्वयंवर.

श्रीकृष्ण रुक्मिणी घेऊन गेल्यावर, वीर सावध होऊन पाहातात तों रुक्मिणी दिसेना. तेव्हां सख्यांस विचारूं लागले. त्या ह्मणाल्या—इतके तुह्मीं रक्षक असतां, एक शंख, चक्र, पद्म, गदा अशीं चार आयुधें हातांत असलेला वीर येऊन, त्यानें नवरी नेली. असें ऐकतांच गोरक्षकानें नवरी नेली, असा एकच हाहाकार होऊन, सर्व वीर शोधास निघाले. तोंच श्रीकृष्ण बलरामानें रथ फिरविले. त्याबरोबर दोन्हीं दळें एकत्र मिळून त्यांचें तुंबळ युद्ध झालें. त्यांत यादववीर मागें फिरले, असें रुक्मिणीनें पाहतांच, ती घाबरून ह्मणाली—इकडे सासरें

व तिकडे माहेर ! जरी बंधु किंवा दीर रणांत पडले तरी दोन्हीं पक्षीं नुकसानीच होय. मग तिनें श्रीकृष्णाकडे पाहिलें; तोंच श्रीहरीनें अंतर जाणून रुक्मिणीस हृदयीं धरून भिऊं नको असें सांगितलें. नंतर बळरामानें नांगर मुसळाच्या मारानें शत्रूस जर्जर करून पळावयास लाविलें. तों नगराबाहेर शिशुपाळ आला त्यास असंख्य प्रेतें भेटलीं. जरासंध शिशुपाळास ह्मणाला–तूं उगाच मागें फिर, आज जयकाळ आपल्यास दिसत नाहीं. मग ते आपल्या नगरास गेले.

असें पाहून रुक्मया सैन्यासह रथांत बसून आला व श्रीकृष्णाचें गोकुळांतील उणें काढूं लागला. तेव्हां परस्पराचें युद्ध जुंपून कृष्णानें सहा बाण सोडून, चारांनीं वारू, एकानें सारथ्याचें शिर व एकानें ध्वज तोडिला. नंतर तरवार घेऊन येतांच, कृष्णानें शीर छेदावयास दिव्यशस्त्र काढिलें. तेव्हां रुक्मिणी भयाभीत होऊन, तिनें श्रीहरीचे चरण धरले. त्यावेळीं कृष्ण ह्मणाला–यानें माझी निंदा केली, याचें शीर आतांच छेदितों. श्रीहरीचा असा निकर पाहतांच, भीमकी ह्मणाली–सासरें आणि माहेर या दोन्हीं ठिकाणीं तुह्मीं व्यापक आहां; तरी याच्या अहंदेह बुद्धीचें छेदन करावें.

रुक्मिणीचें हें वचन ऐकतांच, मनमोहनास कृपा उपजून तिचें मुख कुर्वाळून समाधान केलें आणि रुक्मयाची अर्ध दाढी

मिशी बोडून मुखाला काळें फांसून, रथाला बांधलें व आतां भावाला आरती कर असें सांगितलें. त्याचे सर्व वीर पळून गेले. मग बळिभद्र श्रीकृष्णाजवळ येतांच, रुक्मयास पाहून ह्मणाला–हा आमचा सोयरा, याचा गौरव चांगला केलास. असें बोलून ह्मणाला–समयीं जय अथवा पराजय अवश्यांस घडतो. परंतु वीरास कधीं विटंबूं नये. हें तूं अनुचित केलेंस. मग त्याला सोडून देतांच भोजकट नगर वसवून तेथेंच राहिला. असो.

मग श्रीकृष्ण यादवांसह द्वारकेस निघाला, तो सोरटी सोमनाथाजवळ मूळमाधवास राहिला. इकडे भीमकास झालेला वृत्तांत कळतांच आनंद होऊन, तो सैन्यासह मूळमाधवीं येऊन कृष्णास भेटला, आणि ह्मणाला–आतां कौंडणपुरास चला, तेथें विधियुक्त विवाह करूं. बळराम बोलला-याच ठिकाणीं लग्नसोहळा करावा. तें वचन भीमकास मानवून देशोदेशींच्या राजांस पत्रें लिहिलीं, दिव्य शिबिरें उभीं केलीं, द्वारकेंतील मंडळी व उग्रसेन वसुदेव आदिकरून लग्नसमारंभास आले. आणखी लग्न पाहण्याकरितां सर्व दैवतें, नवकोटी चामुंडा, छप्पन्न कोटी कात्यायनी, गणपती इत्यादि मंडपांत आलीं. देवक स्थापना झाल्यावर भीमकीस हळदी लाविली; शेष हळद कृष्णास पाठविली. वाद्यें वाजूं लागलीं, अपार दानें वांटलीं. रुखवताचीं ताटें भरून आलीं,

शुद्धमतीनें लिंबलोण केलें, भोजनें झालीं, कृष्णाचे हातांत भीमकीनें मुद्रिका घातली. नंतर वर मंडपांत आणून वस्त्रालंकार अर्पून, लग्नघडी भरतांच, अंतरपाट धरिला व यथाविधी लग्न लावून, नवरी कडेवर घेऊन बाहुल्यावर आणून सर्व विधि-विधान केलें. शुद्धमतीनें देवकीस सुनमुख पाहण्यास आणिली. नंतर हळदी उटणें, नांवें घेणें वगैरे प्रकार विधियुक्त होऊन चार दिवस लग्न सोहळा थाटानें झाला. तो वर्णन करण्यास शेषाचीही शक्ति नाहीं. त्यानंतर श्रीकृष्ण भीमकीसह द्वारकेस येऊन आनंदानें राहिला.

अध्याय २९ वा.

स्यमंतकमण्याची कथा.

मागध देशांतील सत्राजीत यादवानें सूर्यास प्रसन्न करून घेऊन एक स्यमंतक मणी मिळविला होता. त्याची सूर्यासारखी प्रभा असून, त्यापासून नित्य अष्टभार सुवर्ण प्रसवत असे. तो मणी एके दिवशीं सत्राजीत गळ्यांत घालून आपल्या सैन्यासह द्वारकेस आला. त्याला मान देऊन श्रीकृष्णानें सभेंत बसविला. त्या मण्याचें तेज पाहतांच सर्व सभा तटस्थ झाली. तों नारद मुनी कृष्णाच्या कानाशीं लागून म्हणाला—या मण्याचें

तेज कौस्तुभाहून जास्त असून, तो तुमच्या कंठांत असावा. श्रीकृष्ण बोलला–तो आपल्या हातास कसा येईल ? नारदानें ह्मटलें–मी मागून घेतों. असें बोलून सत्राजितास ह्मणाला–राजा ! हा मणी जर कृष्णास अर्पण करशील तर तुझी त्रिभुवनांत कीर्ति होईल.

असें ऐकतांच, सत्राजितास क्रोध येऊन, आजपासून तुमच्या सभेस आह्मीं येणार नाहीं, असें सांगून नगरास येऊन तो मणी देव्हाऱ्यांत ठेविला. पुढें राजाचा धाकटा भाऊ प्रसेन तो मणी गळ्यांत घालून मृगयेस निघाला. तों एक मृग दृष्टीस पडतांच, सैन्य मागें टाकून त्याच्या मागें लागून घोर अरण्यांत शिरतांच, मण्याचें तेज पाहून, एक सिंह दरींतून बाहेर पडला आणि प्रसेनास मारून मणी घेऊन पुढें चालला, तों बहात्तर कोटी रिसांचा राजा जांबुवंत समोरून येत होता, त्यानें सिंहाला मारून मणी घेतला. जांबुवंत हा ब्रह्मदेवाचा अवतार रामकार्यास साह्य झाला होता.

पूर्वीं श्रीरामानें रावणास मारून अयोध्येंत येऊन अकरा हजार वर्षें राज्य केलें. एके दिवशीं श्रीराम सभेंत बसला असतां, जांबुवंत हात जोडून रामास ह्मणाला–तुमच्यावरोबर झोंबी घ्यावी अशी माझी इच्छा आहे. असें ऐकतांच, राम हांसून ह्मणाला–हा तुझा नेम कृष्णावतारीं स्यमंतक मण्या चेवेळीं

पूर्ण करीन. असें सांगून श्रीरामानें अवतार संपविला. जांबुवंत पाताळविवरांत जाऊन, आपल्या जांबुवंती कुमारीच्या पाळण्यावर तो मणी बांधिला.

हा इतका वृत्तांत झाला, परंतु आळ श्रीहरीवर येऊन, प्रसेनास कृष्णानें मारलें व मणी नेला असें लोक बोलूं लागले. सत्राजितानेंही सांगून पाठविलें कीं, आमच्या बंधूस मारून तूं मणी नेलास. असा हा आपल्याला डाग लागला असें कृष्णानें जाणून, चतुरंग दळ सिद्ध करून शोध करण्याकरितां अरण्यांत चालला. तों प्रसेनाचें कलेवर आढळलें. पुढें सिंहाचें प्रेत पाहिलें. नंतर रिसाचीं पावलें लागलेलीं दिसलीं; त्यांच्या शोधावरून एक विवर लागलें. तेव्हां श्रीकृष्णानें सर्वांस द्वारकेस जाण्यास सांगून, मी अठ्ठाविसावे दिवशीं मणी घेऊन येतों असें सांगितलें.

इकडे श्रीकृष्ण विवरांतून ऋक्षपतीच्या नगरांत येऊन, जांबुवंताचे मंदिरांत गुप्तरूपानें गेला. तों मणी पाळण्यावर बांधलेला दृष्टीस पडला. जांबुवंताच्या स्त्रियांनीं कृष्णास पाहतांच, त्या तटस्थ होत्सात्या ह्मणाल्या—हे सकुमारा ! जों जांबुवंत निद्रिस्थ आहे तों येथून तूं लौकर जा. तो जागा झाल्यावर तुला सगळाच गिळून टाकील. कृष्ण ह्मणाला—पाळण्यावर बांधलेला मणी जर मला सोडून द्याल तर मी येथून उगाच जाईन. नाहींतर विपरित करणी करीन. त्या

म्हणाल्या–अरे शहाण्या ! जोंपर्यंत जांबुवंतास राग आला नाहीं तोंपर्यंतच ह्या तुझ्या गोष्टी !

मग श्रीकृष्णानें हांसून पितांबराचे पदर खोवून भुजा पिटून धरणीवर प्राय आपटले. त्यावरोबर जांबुवंत जागा होऊन, रागानें तूं कोणाचा कोण म्हणून विचारूं लागला. हरि म्हणाला-तूं मणी चोरून आणलास म्हणून तुला शिक्षा करावयास आलों आहें. असें ऐकतांच जांबुवंत धांवत आला. मग उभयतांचें मल्लयुद्ध होऊन जांबुवंत क्षीण होतांच, त्यानें श्रीरामाचें स्मरण केलें; तोंच कृष्णानें रामरूप धरलें. तें पाहतांच जांबुवंतानें चरण धरले. नंतर राम अवतारांतील युद्धवरदान तुला पावलें काय म्हणून विचारून जांबुवंतास भेटला. तेव्हां जांबुवंत सद्गदित होऊन, राम तोच कृष्ण असें समजला.

नंतर जांबुवंतानें श्रीकृष्णाची पूजा करून, आपली जांबुवंती कन्या अर्पण करून, मणी आंदण देऊन, लग्न सोहळा थाटानें केला. तोंच तेथें नारदमुनी आला व कृष्णास हांसून म्हणाला–श्रीकृष्णा ! नवरीजवळ केंस पुष्कळ आहेत, ही जवळ घेऊन कसा निजशील ? रुक्मिणी पेक्षांही हिचें रूप मला जास्त वाटतें. मग हळदी उटणाचा सोहाळा झाल्यावर, श्रीकृष्णानें नारदास गायन करण्यास सांगितलें; परंतु नारदानें त्याच्या शब्दास मान दिला नाहीं. म्हणून नारदाचा अभिमान झाडण्याकरितां,

श्रीहरीनें एक लहानसा अस्वल बोलावून, त्याच्याकडून गायन करवून नारदाचा गर्व हरण करतांच, नारदानें अस्वलाचे चरण धरले. नंतर नारदाचा विणा शिळेंत गुंततांच, श्रीहरीनें दुसऱ्या एका अस्वलाकडून गायन करवून सोडविला.

असा चार दिवस सोहळा झाल्यावर, मणी आंदण घेऊन श्रीहरी जांबुवंतीसह द्वारकेस आला व सत्राजितास बोलावून स्यमंतक मणी हातांत दिला. तो पाहतांच सत्राजित लज्जित झाला आणि मनांत ह्मणाला–आतां सत्यभामा आणि हा मणी श्रीहरीस देऊन, त्याची समजूत करावी. मग कन्येचा अंगिकार करण्याबद्दल श्रीहरीची विनवणी करून, मण्यासह सत्यभामा अर्पण केली व अपार धन, गज, रथही दिले.

नंतर श्रीहरी सत्राजितास ह्मणाला–तुह्मीं खेद करूं नका, आह्मीं गोकुळांत असतां, गाईच्या खुरांत सांचलेल्या पाण्यांत वरदचतुर्थीचा चंद्र पाहिला होता, ह्मणून हा आळ आमचेवर आला. असें ऐकून सत्राजितानें विचारलें कीं, गणेश चतुर्थीस चंद्रमंडल कां पाहूं नये ? श्रीहरी ह्मणाला–एकदां प्रदोषकाळीं शिवदर्शनाकरितां सर्व देवांचे भार आपापल्या वाहनांवर बसून चालले होते, त्यांत गणपतीही मूषकावर बसून चालला असतां, शिवगिरी चढतांना दाटी झाली, तेव्हां गणपती मूषकावरून खालीं पडला. त्यास पाहतांच चंद्र हांसला. तेव्हां गणपतीनें

शाप दिला कीं, जो तुझें मुख पाहील त्याचेवर अपजाळ येतील. मग देवांनीं चंद्रास आणून गणपतीच्या पायांवर घालतांच, फक्त वरदचतुर्थीस मुख पाहूं नये असें सांगितलें. असा पूर्व वृत्तांत आहे.

मग श्रीहरी सत्राजितास ह्मणाला–तुह्मीं सत्यभामा रत्न आह्मांस दिलें; इतक्यानें आमचें समाधान झालें. तरी हा मणी तुह्मीं परत घेऊन जा. नंतर सत्राजित मणी घेऊन गांवीं आला. पुढें कांहीं दिवस लोटल्यावर, पूर्वीं सत्यभामा शतधन्व्यास देण्याचा नेम केला होता, तो सांडून श्रीकृष्णास दिली ह्मणून शतधन्व्यानें तो द्वेष मनांत धरून, सत्राजिताच्या नगरांत येऊन, तो निजला असतां, त्याचा शिरच्छेद करून, मणी घेऊन पळाला व द्वारकेंत गुप्त राहिला. ती बातमी सत्यभामेस कळतांच ती शोक करूं लागली. त्यावेळीं रामकृष्ण पांडवांच्या समाचाराकरितां हस्तनापुरास गेले होते. तिकडे सत्यभामेनें जाऊन सर्व वृत्तांत निवेदन केला. तो ऐकतांच, रामकृष्ण संतप्त होत्सात्ते द्वारकेंत आले. ती बातमी शतधन्व्यास कळतांच, त्यानें तो मणी अक्रूराकडे ठेवून, पूर्व समुद्रापर्यंत पलायन केलें, तोंच श्रीहरीनें सुदर्शन टाकून शतधन्व्याचें शीर उडविलें, पण मणी मिळाला नाहीं.

त्यानंतर द्वारकेंत मण्याबद्दल डांगोरा पिटला. तो अक्रूरानें

ऐकतांच, तो वाराणसींत पळून गेला. अशी बातमी कृष्णास लागतांच, रात्रंदिवस चिंता करूं लागला. पुढें बारा वर्षेपर्यंत द्वारकेंत दुष्काळ पडला. नंतर देववाणी झाली कीं, अक्रूरास द्वारकेंत आणाल तर पर्जन्यवर्षाव होईल. मग श्रीकृष्णानें उद्धवास पाठवून अक्रूरास द्वारकेंत आणिलें. तेव्हां श्रीकृष्णाची भेट होऊन अक्रूरानें मणी पुढें ठेविला. तो श्रीहरीनें सत्यभामेजवळ देऊन, तिचें समाधान केलें. त्यावेळीं अद्भुत पर्जन्य वर्षून सर्वांस सुख झालें.

अध्याय २६ वा.

श्रीकृष्णाच्या अष्टनायिका, नरकासुरवध व सोळा हजार एकशें स्त्रिया वरणें.

कंसासुर निमाल्यावर कांहीं काळानें पृथ्वीवर दैत्य उत्पन्न होऊन, ते भक्तजनांस गांजूं लागले. ह्मणूनच श्रीकृष्णानें अवतार धारण केला. उन्मत्त वार्ष्णेय गंधर्व तोच कुरुकुळांत धृतराष्ट्र जन्मला. दुष्ट कलीचें जें रूप तेंच दुर्योधन रूपानें जन्मलें. दुःशासनादिक शंभर बंधु तेच राक्षस प्रगट झाले. जयविजयांश रावण कुंभकर्ण तेच शिशुपाल वक्रदंत व जरासंधादि कालयवन

दैत्यांश जन्मले. असे मागध, चैद्य, कौरव, भौमासुर, बाणादिक दुष्ट द्वापारयुगीं जन्मले. वसुवीर्य गंगेच्या पोटीं भीष्म जन्मला, गुरु बृहस्पती तोच द्रोणाचार्य, कृपाचार्य रुद्रगणांचा अंश गौतम वीर्यापासून झाला. शिव हृदयांतील क्रोध तो अश्वत्थामा, सूर्यांश कर्ण कुंती पोटीं जन्मला. यम, वायु, इंद्र, आश्विनीकुमार यांचे अंश धर्मादिक पांच पांडव अवतरले, पृथ्वीवरील भार उतरण्याकरितां श्रीहरीनें पांडव याच पांच दिवट्या हातीं धरून, ब्रह्मांडमंडपांत गोंधळ घालून, दुर्योधनादिक दुष्टांच्या रणांत आहुती दिल्या. येथपर्यंत श्रीकृष्णाचें बालचरित्र झालें. पुढें कौरव पांडव व श्रीहरीचें प्रौढ चरित्र वर्णन केलें आहे. एके दिवशीं हस्तनापुराहून अर्जुन कृष्णाचे भेटीस आला. उभयतां क्षेमालिंगन झाल्यावर दोघे चतुरंग सैन्यासह रथांत बसून मृगया करण्याकरितां निघून यमुनेवर आले. तों तेथें एक सुंदर कामिनी श्रीकृष्णानें पाहिली. तेव्हां अर्जुनास ह्मणाला ती स्त्री कोण, तप कां करिते व तिचा कुल वर्ण कोणता तें विचारून ये. मग अर्जुनानें विचारतांच ती ह्मणाली—मी सूर्यकन्या असून कृष्णप्राप्तिकरितांच तप करित आहें. अर्जुन ह्मणाला–तुझें तप फळास आलें, तूं ज्याची इच्छा करितेस तोच मृगयेकरितां येथें आला आहे. असें ऐकून त्याची माझी भेटी करून द्या असें ती अर्जुनास ह्मणाली.

असें ऐकून पार्थ श्रीकृष्णाजवळ आला व सर्व वृत्तांत निवेदन करितांच, श्रीकृष्ण कालिंदीजवळ आला. त्याला पाहतांच कालिंदीनें गळ्यांत माळ घातली, तेव्हां श्रीहरीनें आलिंगन देऊन रथांत घालून द्वारकेंत आणिली आणि सुमुहूर्त पाहून यथाविधि लग्न केलें.

त्यानंतर अवंतीचा राजा मित्रविंद, त्याला वसुदेवाची बहिण सात्वती दिली होती. त्याची कन्या मित्रविंदा श्रीकृष्णाचें ध्यान करित असे. ती उपवर होतांच बापास ह्मणाली–मला कृष्णनाथास द्यावी. इतर पुरुष तुजसमान होत. हें तिचें वचन ऐकून राजास आनंद झाला. परंतु तिचे चौघे बंधु होते, ते कृष्णाचा द्वेष करित असत. त्यांनीं देशोदेशींचे राजे बोलावून बहिणीस सभेंत आणून, हातांत माळ दिली. त्यावेळीं मित्रविंदेनें हरीचा धांवा करून ह्मटलें-श्यामसुंदरा ! यासमयीं न पावशील तर हा देह ठेवणार नाहीं. असें तिचें अंतर जाणून, श्रीकृष्ण रथारूड होऊन निजभारासह अवंती नगरीं आला; त्यास पाहतांच राजे भयाभीत झाले. श्रीहरी सभेंत येतांच, मित्रविंदेनें गळ्यांत माळ घातली. त्या बरोबर नवरी उचलून रथांत घालून, द्वारकेकडे परतला. त्यावेळीं हाहाःकार होऊन राजे व चौघे बंधु युद्धास उठले. त्यांस श्रीहरीनें पळवून लाविलें. नंतर द्वारकेस येऊन चार दिवसपर्यंत यथाविधी लग्न केलें.

पुढें याज्ञजीत राजाची याज्ञजिती कन्या उपवर होतांच, पृथ्वीवरील राजे मागण्यास आले. तेव्हां तिच्या बापानें पण केला कीं, सात बैलाचीं नासिकें एका हातानें आंवळून, एकदांच वेसण घालील, अशा बलाढ्य वीरास कन्या देईन. तेथें देशोदेशींचे राजे, कर्ण दुर्योधनादिक आले, परंतु कोणाच्यानें पण जिंकवला नाहीं. शेवटीं श्रीकृष्णानें पण जिंकून याज्ञजितीस घेऊन द्वारकेंत आला व यथाविधी पाणिग्रहण केलें. नंतर मद्ररायाची मद्रावती कन्या श्रीकृष्णानें वरिली. तशीच लक्ष्मणसेनाची लक्ष्मणा कन्येनें मत्स्ययंत्र भेदण्याचा दुर्धर पण केला होता, तो जिंकून लक्ष्मणेस वरिली व द्वारकेस आला.

श्रीकृष्णानें रुक्मिणी, जांबुवंती, सत्यभामा, कालिंदी, मित्रविंदा, याज्ञजिती, मद्रावती व लक्ष्मणा अशा अष्टनायिका वरून द्वारकेंत नांदत असतां, नारद मुनीची स्वारी सभेंत आली. त्याची श्रीहरीनें पूजा केली. नारदानें आणलेल्या पारिजातकाच्या फुलाचा वास द्वारकेंत दुमदुमून राहिला. तें फूल श्रीहरीस दिलें. नंतर सभा विसर्जन झाल्यावर, श्रीकृष्णानें तें फूल रुक्मिणीस नेऊन दिलें ती बातमी सत्यभामेस कळतांच, ती रागानें संतप्त झाली आणि सर्व उपचार वर्ज करून विकल पडली. मग सख्यांस ह्मणाली—त्या चित्तचोराला माझ्या येथें

येऊं देऊं नका. तो माझ्या सवतीचा कपटी जार त्याचा मला स्पर्शही नको.

हें वर्तमान श्रीहरींस समजतांच, सत्यभामेच्या मंदिरास येऊन, तिची दशा पाहून ह्मणाला—आमची राणी अशी भूमीवर कां लोळत आहे? असें विचारुन पितांबरानें नेत्र पुसले. तेव्हां सत्यभामा स्फुंदत ह्मणाली—जिला सुमन दिलें तिचें समाधान करा जा. आपलें मन माझेवर असतें तर तिला सुमन कां दिलें असतें? कृष्ण हांसून ह्मणाला—नारदानें फूल आणलें तें तिला दिलें, पाहिजे तर तुझ्या दारांत वृक्षच आणून लावितों. असें बोलून समाधान केलें.

तोंच इंद्र येऊन सांगूं लागला कीं, नरकासुरानें मुगुट व अदिती मातेचीं कुंडलें नेलीं. असें ऐकून श्रीरंगानें चतुरंग दळासह यादवभार सिद्ध केला. तेव्हां सत्यभामा बोलली, मीही तुमच्याबरोबर युद्ध पहावयास येतें. मग तिच्या आग्रहास्तव पुढील भविष्य जाणून सत्यभामेस बरोबर घेतली, व गरुडारूढ होऊन, दैत्यपुरीजवळ आला. त्या प्रतापी नरकासुरानें सोळा हजार एकशें राजकन्या स्त्रिया करण्याच्या इराद्यानें बंदींत ठेविल्या होत्या. त्याच्या नगरास श्रीहरीनें वेढा घातला. तो समाचार नरकासुरास कळतांच, सैन्याची तयारी करून युद्धास सिद्ध झाला. अपार रणवाद्यें वाजूं लागलीं. उभय पक्षाकडून

तुंबळ युद्ध सुरू होऊन, त्यांत यादव पळूं लागतांच, श्रीरंगानें धनुष्य हातांत घेतलें. तोंच सत्यभामा ह्मणाली—मजजवळ धनुष्य द्या, मी नरकासुराशीं युद्ध करितें. मग सत्यभामेच्या हातीं धनुष्य देतांच, तिला आवेश चढून ती निकरानें लढूं लागली. नंतर सत्यभामेस मागें घालून, श्रीहरीनें सुदर्शन सोडून, आश्विन वद्य चतुर्दशीस तीन प्रहर रात्रीस चंद्रोदयीं नरकासुरास मुक्ति दिली. या समयीं जे नर मंगलस्नान करणार नाहींत ते जन्मपर्यंत दरिद्री दुराचारी होतील.

त्या दैत्याच्या नगराचें नांव प्रागज्योतिषपुर असें होतें. तेथलि मणिपुर पर्वतावरील रत्नखचित मंदिरांत सोळा हजार एकशें सुंदर गोपिका ठेविल्या होत्या. त्यांनीं कृष्णास पाहतांच, नमस्कार करून आमचा उद्धार करा, असें सांगितलें. नंतर सोळा हजार एकशें रथ श्रीहरीनें आणवून, त्यांत गोपिकांस बसवून द्वारकेंत पाठवून दिलें.

नंतर नरकासुराची स्त्री पुत्रासह श्रीहरीस शरण येऊन, मुगूट कुंडलें पुढें आणून ठेविलीं. मग भगदत्त पुत्रावर छत्र धरिलें व मुगूट कुंडलें इंद्रास नेऊन दिलीं, आणि नंदनवनांतील पारिजातक वृक्ष घेऊन निघाला. ती बातमी इंद्रास कळतांच, क्रोधानें युद्धास धांवत आला. त्याला बृहस्पतीनें मागें फिरवितांच, इंद्र कृष्णास शरण गेला. मग श्रीरंग द्वारकेंत येऊन तो वृक्ष सत्यभामेच्या दारांत लाविला; त्यामुळें सत्यभामेस गर्व झाला.

त्यानंतर श्रीहरी रुक्मिणीच्या घरीं येतांच, ती ह्मणाली— पारिजातक तिच्या दारांत लाविला आणि मला एक फूल आणून दिलें! कृष्ण ह्मणाला—तुला वृक्ष कशाला हवा ? असंख्य पुष्पें तुझ्या आंगणांत पडतील. मग विश्वकर्म्याकडून सोळा हजार एकशें मंदिरें तयार करवून, तितकींच रूपें आपण नटून, एकाच घटकेंत गोपिकांस वरिलें. चार दिवस लग्न सोहळा झाल्यावर, चारी वर्णांस वस्त्रालंकार देऊन, सर्वांची पाठवणी केली. श्रीकृष्ण एकपत्नीव्रती रुक्मिणी वेगळा एक क्षण नसून, इच्छारूप धरून सोळा हजार घरांत वसत असे.

अध्याय २७ वा.

स्त्रियांचें भाषण, वेणीचा पण, विनोद, मदन-जन्म, शंबरासुरवध व अनिरुद्धजन्म.

एकदां रुक्मिणीच्या मंदिरांत सर्व कृष्णस्त्रिया जमल्या असतां तेथें सत्यभामा हांसून ह्मणाली—सर्व जणींहून माझ्यावर श्रीकृष्णाची प्रीति जास्त असून, माझ्या दारांत पारिजातक वृक्ष लाविला! व मजपाशींच एकांत गोष्टी बोलतात. दुसरी ह्मणाली—त्याचें माझेवर प्रेम जास्त असून रात्रीं आपल्या मुखांतील तांबूल मला दिलें. तिसरी बोलली—कालची रात्र माझ्या

येथें असून, नवीन आणलेले अलंकार आपल्या हातांनीं मला लेवविले. अशा प्रकारें माझ्यावरच जास्त प्रीति आहे अशीं जिचींतिचीं भाषणें चाललीं असतां, आदिमाया रुक्मिणी ह्मणाली–तुह्मीं उगाच गलबला करूं नका. तुमच्या सोळा हजार मंदिरांत कंसारी एकटाच व्यापक असून, अनंत ब्रह्मांडांत भरून उरला आहे. हें न जाणून उगाच भांडतां कां ? असें ऐकून सर्व स्त्रिया निरुत्तर होत्सात्या समाधान पावल्या.

नंतर सत्यभामा रुक्मिणीस ह्मणाली–जर तुला आधीं पुत्र झाला तर मी आपली वेणी तुला देईन आणि मला अगोदर झाला तर तूं आपली वेणी मला द्यावी. असें बोलतांच रुक्मिणीस हांसूं आलें. मग वस्त्रें विडे सर्वांस दिल्यावर सर्व स्त्रिया आपापल्या मंदिरीं गेल्या. इकडे नारद मुनी कृष्णकामिनींपैकीं ज्ञानखाणी कोणती ती निवडावी असें मनांत आणून, द्वारकेंत आला आणि एका गोपीच्या मंदिरांत जाऊन ह्मणाला–तुझें मन परपुरुषावर जडलें आहे ? ती रागानें बोलली–आमचें कृष्णावेगळें ध्यान नाहीं आणि परपुरुषीं मन आहे असें कसें ह्मणतां ? मग दुसरीच्या घरीं गेला, तिला तसेंच विचारतांच, तिनें तुमचें मन चळलें कीं काय असें ह्मटलें. याप्रमाणें सत्यभामेच्या घरापर्यंत फिरून शेवटीं रुक्मिणीकडे आला. रुक्मिणीनें पूजन केल्यावर, परपुरुषीं

मन आहे काय ? ह्मणून नारदानें विचारलें. रुक्मिणी बोलली—परपुरुषाशिवाय मला क्षणभर राहावत नाहीं. परपुरुषास मनांत न धरल्यानें जिणें व्यर्थ जातें. जो चार वाचाहून निराळा, वेदशास्त्रास अगोचर तोच यादवेंद्र परात्पर सोयरा होय. असें ऐकून रुक्मिणीची स्तुति करून निघून गेला.

इकडे कृष्ण सभा विसर्जन करून, रुक्मिणीच्या विलासस्थानीं गेला. त्यास आदिमाया ह्मणाली—चक्रपाणी ! मी तुह्मांस योग्य नव्हे. वरकड गोपी जशा आवडतात; तशी इकडे प्रीती नाहीं आणि उगाच पट्टराणी असें नांव ठेविलें आहे. जुनें वस्त्र होतांच श्रीमंत दूर फेंकतात ! असें ऐकून श्रीहरी ह्मणाला—तुझ्या सुंदर स्वरूपास पृथ्वीचे राजे भुलले असतां, मला कां वरलेंस ? मी रानटी गोवळा, पक्ष्यावर बसणारा, सर्पावर निजणारा, अर्जुनाचीं घोडीं धुणारा, धर्माच्या घरीं उष्टीं काढणारा, मी काळा तूं गोरी, मी निष्काम आहें. तरी आतां शिशुपाळ, वक्रदंत, जरासंधादिकांपैकीं आवडेल त्यास माळ घाल.

अशीं उदास वचनें ऐकतांच, रुक्मिणी मूर्च्छागत होऊन प्राण व्याकूळ झाले. तोंच श्रीहरीनें हृदयीं धरून आलिंगन देऊन तिचें अनेक प्रकारें समाधान केलें. नंतर रुक्मिणी हांसून ह्मणाली—मला पुत्रसंतान नाहीं त्यामुळें सदन शून्य दिसतें. ज्याचे पोटीं पुत्र नाहीं त्याचा संसार व्यर्थ असून, अंतीं

स्वर्गलोकाची प्राप्ती होत नाहीं, असें शास्त्र बोलतें. यास्तव सर्वगुणसंपन्न मदनासारखा पुत्र व्हावा. असें वचन ऐकून उग्रसेन बळिभद्रास नगर संरक्षण सांगून, श्रीकृष्ण हिमाचळीं जाऊन तपास बसला. एक वर्ष निराहार तपास बसून, तपांतीं शंकर प्रगट होतांच, श्रीहरीनें मदनासारखा पुत्र मागितला. तेव्हां शिवानें सांगितलें–पूर्वी मी मदन दग्ध केला तोच तुझ्या पोटीं प्रद्युम्न होईल. आतां मदन जाळण्याचें कारण सांगतों ऐका.

पूर्वीं दक्षाच्या यज्ञांत पार्वतीनें देह समर्पिला. त्या दक्षास शिवानें मारिला. पुढें शिवानें हिमाचळीं जाऊन बहुत काळ तप केलें. पार्वती हिमाचळाचे पोटीं पुनः अवतरून, तिनें शिवास वरिलें. पुढें तारकासुरानें त्रैलोक्यास त्रास दिला. त्यावेळीं त्याच्या संहाराचा देव विचार करूं लागले. बृहस्पती ह्मणाला–शिवाला मुलगा होईल त्याच्या हातून तारकासुराचा मृत्यु होईल. शिव कामाचा त्याग करून तप करित आहे. त्याला काम उद्भवेल तरच पुत्र होईल. मग त्या कामीं मदनाची योजना करितांच, तो हिमाचळीं येऊन पार्वतीजवळ राहिला. जेथें शिव अनुष्ठान करित होता, तें वन वसंतानें शृंगारून टाकिलें. मग पार्वती मदनासह शिवाजवळ येऊन उभी राहतांच, मदनानें शिवहृदयीं संचार केला. त्यामुळें

ध्यानास विक्षेप होऊन, तृतीय नेत्रांतील प्रळयाग्नीनें मदनास जाळून टाकल्यावर शिवास विचार पडला कीं, देवांनीं कार्यास पाठविलेला मदन मी व्यर्थ जाळून भस्म केला. त्यावेळीं मदनाची स्त्री रती शिवापुढें येऊन शोक करूं लागली; तेव्हां शिवानें सांगितलें—कृष्णाच्या पोटीं तुझा पति जन्म घेईल.

रती पतिसाठीं अरण्यांत शोक करित असतां, शंबरदैत्य मृगयेस आला होता, त्याच्या दृष्टीस पडली. तिला कन्या मानून घरीं स्वयंपाक करावयास ठेविली. इकडे रुक्मिणीस गर्भ राहतांच, वेणीच्या पणाबद्दल सत्यभामेस धाक पडला. पुढें रुक्मिणीस पुत्र होतांच, भांडारें फोडून याचकांस अपार द्रव्य वाटलें. पांचवे दिवशीं कृष्ण देवीचा नवस फेडण्याकरितां यादवांसह शक्तिवनांत गेला.

इकडे नारद सत्यभामेच्या मंदिरांत येतांच, रुक्मिणीस पुत्र झाला, आतां वेणीच्या पणाबद्दल कसें करावें ? ह्मणून भामा विचारूं लागली. तो ह्मणाला—मदनाचा शत्रु शंबर त्याला हें वर्तमान सांगावें. मग त्या दैत्याकडे येऊन ह्मणाला—तुझा शत्रु द्वारकेंत जन्मला आहे. विषवेलीचा मोड लहान असतां खुडून टाकावा. असें ऐकून शंबर गुप्तरूपानें रुक्मिणीच्या मंदिरांत जाऊन, बाळ उचलून घेऊन समुद्रतिरीं येऊन सागरांत फेंकून दिलें. तें एका मत्स्यानें गिळलें.

भीमकी जागी होऊन पाहूं लागली तों पुत्र नाहीं, त्यामुळें शोक करूं लागली. तों शक्तिपूजन करुन कृष्ण आला, त्याला पुत्र नेल्याचें कारण अंतरांत समजलें. मग रुक्मिणीजवळ येतांच, अपार शोक करूं लागली; तेव्हां श्रीहरीनें सांगितलें कीं, तूं शोक करूं नको. बारा वर्षांनंतर तुझा पुत्र तुला भेटेल. त्या पुत्राचें रक्षण श्रीधर माशाच्या उदरीं करित असतां, तो मासा एका कोळ्याला जाळ्यांत सांपडला. त्यानें तो मासा शंबरास नेऊन दिला. शंबरानें रतीजवळ पाक करण्यास पाठविला. तिनें मासा चिरतांच, आंतून दिव्य बाळ निघालें, तें पाहतांच आतां कसें करूं ह्मणून विचारांत पडली. तों तेथें अकस्मात् नारद गुप्तरूपानें येऊन ह्मणाला—हा तुझा भ्रतार मदन कृष्णनंदन होय, याचा सांभाळ कर. नारदानें मंत्र देऊन ह्मटलें—हा फक्त तुलाच दिसेल; इतरांस दिसणार नाहीं. याला कामधेनु येऊन स्तनपान करवील. असें सांगून नारद निघून गेला.

बारा वर्षेंपर्यंत रतीनें मन्मथास वाढविल्यावर नारदानें उभयतांचें गांधर्व लग्न लाविलें. पुढें कांहीं काळानें रतीस गर्भ राहतांच, दैत्यास कळलें कीं, रती गुप्त पुरुषापासून गर्भिणी झाली आहे. असें ऐकतांच त्यास क्रोध आला. त्याच वेळीं मदनाला मंत्रास्त्र धनुष्यबाण आणून नारदानें दिले. दैत्यानें रतीमंदिर वेढितांच ती भीतीनें स्वामी आतां कसें करावें ह्मणून विचारूं

लागली. मदन ह्मणाला—तूं कांहीं चिंता करूं नको. असें बोलून दाराची सांखळी हातांत घेऊन, आरोळी देऊन वीरांचा चुराडा करूं लागला. असें पाहतांच शंबरही युद्धास प्रवर्तून, त्यांचें सात दिवस तुंबळ युद्ध झालें. शेवटीं मदनानें दैत्याचें शीर आकाशांत उडविलें. त्यावेळीं देवांनीं जयजयकार करून पुष्पवृष्टी केली. नंतर कृष्णकुमर रतीस रथांत घेऊन द्वारकेस चालला. द्वारकेजवळ येतांच पुढें बंदिजन पाठवून आपण आल्याचें वर्तमान कळविलें.

तें ऐकतांच, उग्रसेन, उद्धव, अक्रूर, भोगींद्र, यादवेंद्र आदि प्रजाजनांसह सामोरे आले. सर्वांच्या भेटी होऊन आनंद झाला. तोंच नारद येऊन सर्व वर्तमान सांगता झाला. रुक्मिणीची व मदनरतीची भेट झाली. नंतर दिव्य मंडप घालून भांडारें फोडून याचक जनांस सुखी केलें. तों रतीस नवमास भरतांच पुत्र झाला, त्याचें अनिरुद्ध असें नांव ठेविलें. श्रीकृष्ण, मदन व अनिरुद्ध या तिघांचें एकसारखेंच रूप होतें. पुढें सोळा हजार स्त्रिया व अष्टनायिका या प्रत्येक जणीस दहा पुत्र व एक कन्या याप्रमाणें एक लक्ष साठ हजार पुत्र व सोळा हजार कन्या झाल्या. तितक्यांचीं मौंजीबंधनें व लग्नें करून, श्रीकृष्ण कुटुंबवत्सल झाला. त्याच्या त्रिकाल दर्शनास इंद्रादि देव येत असत. असा पूर्णावतारी श्रीरंग द्वारकेंत वसत होता.

अध्याय २८ वा.

उखाचरित्र, बाणासुरवध व उखा-अनिरुद्धाचें लग्न.

मदन शंबर दैत्यास वधून रतीसह द्वारकेंत आल्यावर अनिरुद्ध जन्मला. तो शुक्लपक्षांतील चंद्राप्रमाणें दिवसेंदिवस वाढूं लागला. त्यावर शोणितपुर नगरांत शिववरदी बाणासुर राज्य करित होता तो समरांत कोणास आटपत नव्हता तो बळीचा पुत्र बाणासुर शिवप्रसादानें हजार भुजा पावला होता. त्याला उखा नांवाची एक कन्या होती, ती आपल्या चित्ररेखा सखीसह नित्य विमानांत बसून, अंबिकेच्या पूजनाकरितां शिवलोकास जात असे.

एके दिवशीं शिवपार्वती सारीपाट खेळत असतां, उखा कर जोडून उभी राहिली आणि मनांत ह्मणाली कीं, मीं अशीच भ्रताराबरोबर सारीपाट कधीं खेळेन. तिचा मनोगत पार्वतीनें जाणून ह्मटलें–उखे ! तुला वर केवळ दुसरा मन्मथ प्राप्त होईल. वैशाख शुद्ध द्वादशीस जो पुरुष तुझ्या स्वप्नांत येईल तोच तुझा वर होईल. असें ऐकून उखा मंदिरांत आली. नंतर बाणासुरानें कैलासास जाऊन शिवास पुजून, स्तवन आरंभिलें. तेव्हां शिवानें वर मागण्यास सांगतांच, दैत्य

ह्मणाला—मला भुजांचा भार वाटतो तरी त्यांचें सार्थक होण्याकरितां मला झुंजार द्यावा. शिव बोलला—तुझ्या ध्वजस्तंभाचा मोर उलटून पडेल तेव्हां तुला महा झुंजार भेटेल. मग तो वर आपल्या कुंभक प्रधानास सांगितला; तो ऐकून प्रधान ह्मणाला, आपणच आपल्या घरास आग लावावी तसा वर मागितला. असो.

इकडे उखा चिंताक्रांत असतां, वैशाख शुद्ध द्वादशी जवळ आली. त्या दिवशीं उखा मंदिर शृंगारून वस्त्रालंकार चढवून मंचकावर स्वस्थ निजली असतां, केवळ मदनाचा पुतळा स्वप्नांत येऊन त्यानें संभोग दिला. अरुणोदय होतांच, उखा जागृत झाली तों भ्रतार जवळ नाहीं असें पाहून, हृदय पिटून घेऊं लागली. तेव्हां चित्ररेखेनें काय झालें ह्मणून विचारतांच ह्मणाली—प्राणेश्वर चार प्रहर रात्रीं सेजेवर होता त्याचें मनोहर रूप डोळ्यांसमोर दिसत आहे तोच मला दाखीव; नाहींतर माझे प्राण निघून जातील; असें बोलून मूर्च्छित पडली. मग सखीनें सावध करून तिला ह्मटलें—मी त्रिभुवनांतील चित्रें भिंतीवर लिहितें, त्यांतील तुझा प्राणेश्वर मला दाखीव ह्मणजे त्यास घेऊन येईन.

नंतर भिंती लिंपून सप्तरंगाचीं पात्रें सिद्ध करून चित्ररेखेनें चित्रें काढण्यास आरंभ केला. प्रथम गणपती, सरस्वती, नारद यांचीं चित्रें काढून नमन केलें व वैकुंठ, कैलास,

ब्रह्मलोक, अकरा रुद्र, बारा सूर्य, अष्टवसु, पितृलोक, अष्टदिग्पाळ, ऋषिमंडळ, सप्तपाताळें, नवखंडें, सप्तद्वीपें, छप्पन्न देशाचे राजे इत्यादिक चित्रें काढून दाखविलीं, परंतु तिचा पती दिसला नाहीं. तेव्हां ती आतां प्राण देतें असें बोलूं लागली. मग फक्त एक द्वारका राहिली आहे, असें सांगून, द्वारकेची रचना व सर्वांचीं स्वरूपें काढून दाखविलीं. त्यांतील अनिरुद्धास ओळखून हाच प्राणेश्वर असें दाखविलें. तेव्हां सखीनें घेऊन येतें असें सांगून चित्ररेखा आकाशमार्गानें द्वारकेंत आली. तेथून अकरा हजार योजनें द्वारका दूर होती, परंतु दोन प्रहर रात्र होतांच सखी तेथें गेली. तोंच नारद मुनीची भेट झाली. त्याला सर्व वृत्तांत निवेदन करून ह्मटलें–द्वारके भोंवतें सुदर्शन फिरत आहे तेथें माझा प्रवेश कसा होईल ? नारदानें पुढील भविष्यार्थ जाणून सांगितलें–तूं माझें स्मरण कर ह्मणजे सुदर्शन वाट देईल. मग मोहनमंत्र देऊन सांगितलें कीं, हाच मंत्र अनिरुद्धावर घालून मंचकासह शोणितपुरास घेऊन जा.

मग चित्ररेखेनें सुदर्शनास नारदाची आण घालतांच, मार्ग दिला; तेव्हां ती अनिरुद्धाच्या मंदिरांत उतरली आणि गुरुमंत्र जपून मोहन घालून, अनिरुद्धासह पलंग हातावर घेऊन, अकरा हजार योजनांचा मार्ग एका घटकेंत क्रमून उखेच्या मंदिरांत

आली. उखा वाट पाहात होतीच, तिनें सखीचे चरण धरिले. मग दोघींनीं पलंग मंदिरांत नेऊन, मोहन काढून मन्मथसुत सावध केला. तेव्हां तो चकित होऊन, चोहोंकडे पाहूं लागतांच, चित्ररेखेनें सर्व वृत्तांत निवेदन केला. त्याचवेळीं उखेनें गळ्यांत माळ घालून अनिरुद्धास वरिलें.

याप्रमाणें चार महिनेपर्यंत सुखसोहळा भोगिला तरी बाहेर कोणास कळलें नाहीं. पुढें उखा गरोदर झाली. नंतर बाणासुर सभेंत बसला असतां, आकाशवाणी झाली कीं, बाणा ! आतां सावध राहा. तुजवर विघ्न येत आहे. तोंच ध्वजस्तंभींचा मोर उलथून खालीं पडला. मग दासींकडून उखा गरोदर झाल्याची बातमी राजास कळतांच, त्याला क्रोध चढून कुंभक प्रधानास उखेचें मंदिर वेढून चोर कोण आहे तो धरून आणण्यास सांगितलें. ही बातमी उखेस कळतांच, ती अनिरुद्धास ह्मणाली - मी पापिणीनें तुह्मांस आणून संकटांत टाकिलें. अनिरुद्ध ह्मणाला— उखे ! तूं कांहीं चिंता करूं नको. आह्मीं यादववीर श्रीकृष्णबळानें शत्रूचा संहार करूं. इतक्यांत सैन्याचा घेरा उखेच्या मंदिरास पडला. त्यावरोबर अनिरुद्धास आवेश चढून हातांत दाराची अर्गळा घेऊन तीन कोटी वीरांचीं प्रेतें पाडिलीं.

असें पाहून बाणासुर रथारूढ होऊन पांचशें धनुष्यांस गुण चढवून बाणांचा वर्षाव करूं लागला. परंतु कामसुतानें एक बा-

णही अंगास लागूं दिला नाहीं. नंतर बाणासुरानें नागपाशांत धरून, वध करावयास पहात होता; तोंच कुंभक प्रधान बोलला— हा तुमचा जांवई झाला याचा वध करूं नये. मग त्याला बंदि- शाळेंत ठेविला. त्यावेळीं उखा दुःख करीत मुकुंद कां पावत नाहीं असें बोलूं लागली.

इकडे द्वारकेंत मदनसुत नाहींसा झाला, त्यामुळें रती व रुक्मिणी शोक करूं लागल्या. तों नारदमुनी कृष्णसभेंत येऊन ह्मणाला—पहातां काय ! बाणासुरानें अनिरुद्धास बंदींत कोंडून ठेविलें आहे. असें ऐकतांच, युद्धसंकेत भेरी ठोकून, कृष्णादिक यादवभार तीन प्रहर रात्र होतांच शोणितपुरांत आले. मदनानें अग्निअस्त्र टाकून नगर धडधडां जळावयास लाविलें. इतक्यांत सूर्योदय झाला. बाणासुर स्नान करून शिवार्चन करीत बसला होता. त्यास प्रधानानें वर्तमान कळविलें. त्याबरोबर सैन्यासह बाहेर निघून, उभय पक्षांचें तुंबळ युद्ध सुरू झालें. तोंच नारद कैलासीं जाऊन, शिवास ह्मणाला—तुझ्या वरदपुत्र बाणास याद- वांनीं संग्रामांत वेढिलें आहे.

असें ऐकतांच शिव आठ कोटी गणांसह शोणितपुरास आला. तेव्हां दोन्ही पक्षांकडील शस्त्रास्त्रांचा मारा सुरू झाला. कृष्णानें शिवावर निद्रास्त्र सोडतांच, शिव नंदीवर निजला. त्यावेळीं कार्तिकस्वामी व मदन यांचें द्वंद्व युद्ध झालें. जीं जीं

शस्त्रें शिवपुत्र सोडी तीं तीं मदन जाळून टाकी. शेवटीं मदनानें स्त्रियास्त्र सोडतांच, सात हजार दिव्य स्त्रिया खालीं उतरून, त्यांनीं स्वामींच्या रथास वेढा घातला. असें पाहून कार्तिकस्वामी ह्मणाला—मी आजन्म ब्रह्मचारी असतां, हा काय अनर्थ झाला ! नंतर भस्माचा बटवा कांखेंत मारून डोंगराच्या कपाटांत दडून बसला व त्या स्त्रिया येथें येतील असें वाटून स्वामीनें शाप दिला कीं, ज्या स्त्रिया येथें येऊन माझें दर्शन घेतील त्या सप्तजन्मीं विधवा होतील. मग कार्तिकस्वामी पळाला असें पाहून कुंभक प्रधान पुढें झाला, त्याचा बलरामानें नांगरानें ओढून अंत केला.

नंतर श्रीहरीनें बाणासुरावर सुदर्शन सोडून फक्त दोन भुजा राखून बाकीच्यांचें छेदन केलें. त्याबरोबर बाणासुर विकळ पडून रक्ताचे पूर वाहूं लागले. मग शिवानें बाणास सावध करून, श्रीकृष्णाच्या पायांवर घातला आणि ह्मणाला—नारायणा ! प्रल्हादापासून बलीपर्यंत याचे पूर्वज तुझे भक्त आहेत; यास्तव याच्या माथ्यावर कृपाहस्त ठेवावा. मग श्रीकृष्णानें त्याला हृदयीं धरून अभयवचन दिल्यावर, बाणासुरानें प्रार्थना करितांच सर्वजण नगरांत गेले, व अनिरुद्धास सोडून वस्त्रें भूषणें लेववितांच, ब्रह्मदेवानें येऊन लग्न लाविलें, आणि भांडारें फोडून याचक जनांस सुखी केलें.